पुण्य नगरी
epaper : https://epaper.punyanagari.in

# शहर पोलीस ठाण्यात सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन

## सायबर सुरक्षेकरीता विद्यापीठाचा पुढाकार



**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर सेफ पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षेसाठी सायबर सुरक्षा हा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सायबर क्लबचे विद्यार्थिनींनी शहर पोलीस ठाण्यातील पोलिस अंमलदारांना सायबर सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करीत जनजागृती केली.

देशातील सायबर सुरक्षेबाबत जनजागृती हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशनतर्फे २०१८ पासून सुरु आहे. या उपक्रमांतर्गत सोमवार दि. २१ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणक प्रशाळेची श्रद्धा अहिरराव, विशाखा शिंदे या विद्यार्थिनींनी जळगाव शहर पोलिस ठाण्यात सायबर जनजागृती सत्राचे आयोजन केले होते. या सत्रात सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फसवणुकीपासून बचाव, पासवर्ड सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पो.नि. सागर शिंपी यांच्यासह पोलीस अंमलदार उपस्थित होते. हे सत्र विद्यापीठातील समन्वयक राजू आमले, क्विक हिल फाउंडेशनच्या गायत्री केशकर, दीपू सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

Jalgaon Edition
Jul 22, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com